पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **०९/०८/२०१९** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पहिली सभा (विशेष सभा) **शुक्रवार** दिनांक **०९/०८/२०१९** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्रीम.रुबल अग्रवाल,** (भा.प्र.से.) अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे तथा पिठासीन प्राधिकारी व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.पवार मनिषा प्रमोद
२. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.पाटील – अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंदलकर – कायदा सल्लागार, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा** – सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. **अति.आयुक्त, महानगरपालिका,** आजच्या विशेष सभेत मा.शिक्षण समितीचे सभापती पदावर **पुणे** नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेची पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.शिक्षण समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देते.**

**मा.नगरसचिव -** मा.शिक्षण समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.शिक्षण समिती सभापती पदाकरीता **मा.पवार मनिषा प्रमोद** यांचे मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे छाननी करणेकामी सुपुर्त करण्यात येत आहेत.

**- आता छाननीची कार्यवाही करणेत येईल –**

-

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **सभापती**, शिक्षण समिती

**अतिरिक्त आयुक्त,** पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे.

**महानगरपालिका, पुणे.** त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील

प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.पवार मनिषा प्रमोद | मा.लोखंडे चंदा राजू | मा.सागर बाळासाहेब गवळी |

मा.सभापती, शिक्षण समिती या पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून सदरचे नामनिर्देशनपत्र परिपूर्ण आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशन पत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि समितीच्या दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली आहे. सबब सदरचे नामनिर्देशनपत्र वैध असून स्विकृत करण्यात येत आहे.

त्यामध्ये मा.शिक्षण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.पवार मनिषा प्रमोद** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**- नामनिर्देशनपत्र माघारी घेणे –**

उमेदवारास उमेदवारी अर्ज माघारी घेणेबाबत विचारणा केली असता उमेदवाराने उमेदवारी अर्ज मागे घेणार नसल्याचे सांगितले.

**- उमेदवार निवडून आल्याची घोषणा –**

नामनिर्देशनपत्र माघारी घेणेबाबत विचारणा केली असता उमेदवाराने उमेदवारी मागे घेणार नसल्याचे सांगितले. सबब मा.सभापती, शिक्षण समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.पवार मनिषा प्रमोद** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.पवार मनिषा प्रमोद** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी रुबल अग्रवाल,

पिठासीन प्राधिकारी, तथा अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे, शिक्षण समिती (विशेष सभा) जाहीर करते.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १

दिनांक - ०९/०८/२०१९ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रामधील मा.शिक्षण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.पवार मनिषा प्रमोद** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.पवार मनिषा प्रमोद** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

सही/-
**(रुबल अग्रवाल,** भा.प्र.से.**)**
पिठासीन प्राधिकारी तथा
अति.आयुक्त, पुणे मनपा
शिक्षण समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३६८/२०१९
दिनांक : ०९/०८/२०१९

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड
महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.